Sexcel
Sexed Genetics

Genus ABS



# लैगिंक रेतचा वापर करताना
# करा व करु नये

POWERED BY
IntelliGen
TECHNOLOGIES

Bridging Borders
Unleashing Jersey Bull Genetics
#PROJECT JERSEY

# लैगिंक रेतचा वापर करताना करा व करु नये

कृपया, लैगिंक रेतच्या वापरासाठी खालील सुचनांचे पालन करा

| | करा | करु नये |
|---|---|---|
| **लक्षित प्राणी**<br>(लैगिंक रेतचा वापर सर्व प्राण्यांसाठी करु नये) | लैगिंक रेतचा वापर करण्यासाठी पाडी, त्यानंतर १ ल्या दुग्धपानाचे, नंतर २ ऱ्या दुग्धपानाचे अशाप्रकारे प्राधान्यक्रमाने हे प्राणी सर्वात चांगले आहेत.<br><br>निवडलेले प्राणी पुनरुत्पादक दृष्ट्या निरोगी असले पाहिजेत | प्रत्येक प्राण्यासाठी नाही.<br>वयस्क ३ ऱ्या दुग्धपानानंतरचे वारंवार उलटणाऱ्या गायी वापरु नये.<br><br>पुनरुत्पादक पॅथॉलॉजी (समस्या)–अवघड व मदतीने प्रसुती, गर्भाशय ग्रीवेचा क्षोभ, गर्भाशय स्नायूचा दाह, गर्भाशयात पू किंवा नाळ राखून ठेवल्याचा इ. इतिहास असणाऱ्या प्राण्यासाठी वापरु नये. |
| **पाडीचे कमीत कमी शारीरिकवजन** | पाडीचे प्रजनन वया वरुन न करता वजनानुसार करा. लैगिंक रेतच्या वापरासाठी पाडीचे शारीरिक वजन कमीत कमी ३०० किलो असले पाहिजे.<br><br>कृत्रीम रेतन पूर्वी पाडीच्या कमीत कमी दोन नैसर्गिक माज (Natural Estrus Cycles) झाल्या असल्या पाहिजेत | कमी वजनाच्या पाडीमध्ये वापर करु नये.<br><br>पाडीचे पहिले काही माज हे अंडाशय नसलेले छोटे माज असतात. |
| **माज** | माज, शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी आकृती १<br><br>लैगिंक रेतचे सर्वोत्तम परिणाम हे प्रजनन मोसम म्हणजे सप्टेंबर ते एप्रिलमध्ये मिळू शकतात, ज्यावेळी भारताच्या बहुतांश भागामध्ये तुलनेने कमी तापमान आणि चाऱ्याची उपलब्धता असते.<br><br>ग्रर्भाशयाचा श्लेष्मा (चिकट पदार्थ) हा स्पष्ट, पारदर्शी व दोरीसारखा असला पाहिजे. आकृती २ | २ किंवा जास्त माज तणाव गुण असणाऱ्या प्राण्यांमध्ये वापर करु नये.<br><br>गरम व दमट महिन्यात वापर करु नये. पाडी / गायी जर उच्च उष्णता किंवा उच्च दमट हवामानात श्वास कमी जास्त घेत असतील तर त्यांच्यामध्ये रोगनिदान विषयक बदल घडून येतात, त्यामुळे प्रसुतीला प्रतिबंध होतो.<br><br>उच्च वातावरणीय तापमान व उच्च दमट हवामान हे प्राणघातक संयोजन आहे ज्याचा परिणाम गर्भवती गार्यीच्या प्रजनन क्षमतेवर होतो. |
| **पॅकेजिंग** | प्रत्येक गॉब्लेटमध्ये १० स्ट्रॉ पॅक केलेल्या असतात. उप–वितरणावेळी संपूर्ण गॉब्लेट हस्तांतरीत करा. स्ट्रॉची वारंवार हाताळणी टाळा. | लहान दवाखान्यांना वितरण करीत असताना सुट्या स्ट्रॉ देऊ नये. यामुळे स्ट्रॉचा वारंवार संपर्क होईल आणि त्याचा परिणाम प्रजनन क्षमतेवर होईल. |
| **स्ट्रॉची ओळख** | कॅनिस्टर टॅग किंवा मार्कर स्ट्रीपवरुन वळू ओळखा. प्रत्येक व्हॅसोट्यूब / गॉब्लेटची ओळख वळूचे नाव असणाऱ्या पिवळ्या रंगाच्या मार्कर स्ट्रीपवरुन करावी. आकृती ५<br><br>इच्छित स्ट्रॉ काढल्यानंतर, कॅनिस्टर शक्य तितक्या लवकर त्याच्या मूळस्थितीत ठेवला पाहिजे. | बैल ओळखण्यासाठी स्ट्रॉ / गॉब्लेट फ्रॉस्ट लाईनच्या वर घेऊ नये आकृती ३ |

आकृती १:
माजाच्या स्थितीतील गाय


Image Courtesy:
Mid Valley Dairy Farm



आकृती २:
गर्भाशय ग्रीवातून बाहेर पडणारा मद



आकृती ३: कॅनिस्टर कधीही फ्रॉस्ट लाईनच्या वर उचलू नये.



आकृती ४: गर्भाशयात रेत सोडणे



| | | |
|---|---|---|
| रेतचे हस्तांतरण | नायट्रोजन टँकमधील सर्व रेतचे हस्तांतरण किंवा नायट्रोजन टँकमधून रेतची पुन:प्राप्ती ही शक्य तितक्या लवकर केली पाहिजे. | स्ट्रॉ उच्च तापमानाच्या संपर्कात येऊ देऊ नका. वारंवार गणना व सुट्ट्या स्ट्रॉ वितरणामुळे रेत वितळून गुणवत्ता कमी करते. थेट सुर्यप्रकाशाचा संपर्क टाळा. |
| सिमेन स्ट्रॉ हाताळणी | सिमेनची हाताळणी केवळ चिमट्याने करावी | स्ट्रॉ हस्तांतर करीत असताना हाताचा वापर करु नका. |
| वितळणे | ३७ डिग्रीमध्ये पाण्याचे तापमान ३०-६० सेकंद तपासण्यासाठी थॉ मॉनिटरचा वापर करा. आकृती ६<br>प्राणी जरी समक्रमित केले असले तरी एकावेळी केवळ एक स्ट्रॉ वितळवा.<br>स्ट्रॉ काढल्यानंतर लगेच त्याला एक हलका झटका द्या. वितळवण्याच्या दरम्यान संपूर्ण स्ट्रॉ पाण्यात बुडली पाहिजे.<br>स्ट्रॉ कट करण्यापूर्वी त्याच्या घडी घातलेल्या टोकातील हवेचा बुडबुडा काढण्यासाठी स्ट्रॉ हलवणे. | एकाच वेळी अनेक स्ट्रॉ वितळवू नये.<br>बोटाने तापमान तपासू नका. त्यासाठी थॉ मॉनिटरचा वापर अनिवार्य आहे. |
| रेतन | वितळवण्यापूर्वी प्राणी, एआय गन, शीथ व ग्लोव्हज इ. ची तयारी करुन ठेवा, म्हणजे वितळवल्यानंतर लगेच एआय करता येईल.<br>पंपाचा दट्ट्या हळुवार दाबा, जेणेकरुन रेत थेंबाच्या स्वरुपात गर्भाशयामध्ये जमा होईल. आकृती ४<br>सर्वसाधारण प्रसुती दर (Conception rate) ४०% आहे, म्हणून इच्छित परिणाम मिळण्यासाठी लैंगिक रेतचा वापर करुन २-३ लागोपाठ गर्भाधान करण्याच्या तयारीत रहा. | अगोदर वितळवून नंतर प्राणी किंवा एआय उपकरणाची तयारी करु नका. गर्भाशय ग्रीवा किंवा गर्भाशयाच्या शिंगावर रेत ठेवण्याचे टाळा.<br>रेत जोराने ढकलू नका.<br>अंडाशय / कोश यांची धडधड टाळा. |
| पोषण | कृपया, प्राणी हे सकारात्मक ऊर्जा संतुलनात असल्याची खात्री करा.<br>कृत्रिम रेतनापूर्वी किमान २ महिन्यांचा कालावधी आधी जनावरांना जंतुनाशक औषधी आणि चांगल्या दर्जाचे खनिज मिश्रण द्यावे. | नकारात्मक ऊर्जा संतुलन असणाऱ्या प्राण्याची निवड करु नये. कमी खाणाऱ्या प्राण्यामध्ये (अशक्त) उच्चतम रेत वापरुन सुध्दा गर्भदारणेची शक्यता खूप कमी असते. आकृती ७ |
| गुणवत्ता चाचणी झढच | लैंगिक रेतची PTM फक्त IVOS II (CASA) वर करता येते / केली पाहिजे. आकृती ८ | साधारण / Phase contrast microscope वर करु नये. |

आकृती ५: स्ट्रॉ ओळखण्यासाठी गॉब्लेट व मार्कर स्ट्रीप





Fig : 6 Thaw Monitor



Fig : 7 NEB



Fig : 8 Casa IVOS II



**Genus Breeding India Pvt. Ltd. (ABS India) - Registered Office:** Eternia Premises Co-op Society, 5th Floor, C Wing, Near DA Unit No. 505/506, Dagadi Bunglow, Wakdewadi, Pune 411005 (MAH)
:www.genusabsindia.com :abs.india@genusplc.com :18002109210

Bridging Borders
Unleashing Jersey Bull Genetics
#PROJECT JERSEY

Genus

# चला सेक्सेल सोबत फायदा करून घेऊया!

## जनावरांची निवड

### कालवड (हेफर)

- कृत्रिम रेतन करण्याअगोदर कमीत कमी दोन माज दाखवलेले असावेत.
- कृत्रिम रेतन करण्यासाठी कालवडीचे वजन कमीत 250 ते 300 किलो पर्यंत असावे किंवा परिपक्व वयाचे 60 टक्के.
- कृत्रिम रेतन करण्यासाठी वयापेक्षा शरीराच्या वजनाचा विचार करणे जास्त फायदयाचे आहे.

### गाय / म्हैस

- लिंग वर्गीकृत वीर्य वापरण्यासाठी पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या दुग्धपानातील गाय किंवा म्हशी सर्वात योग्य असतात.
- गायीची शारीरिक स्थिति व्यवस्थित असली पाहिजे आणि ऋतुकाळ चक्र सुरु पाहिजे .
- अवघड प्रसूती (Dystocia) सर्व्हिसिटिस, मेट्रिटिस, पायमेट्रा किंवा वार अडकलेल्या इत्यादीं पूर्वीपासून असलेल्या प्राण्यांचा वापर करू नका.
- जास्त उष्णता आणि जास्त आर्द्रतेमुळे धापणाऱ्या प्राण्यांमध्ये कृत्रिम रेतन करू नका.
- नेहमी उलटणाऱ्या जनावरां मध्ये लिंग वर्गीकृत वीर्य वापरु नका.
- कमजोर, आजारी, किंवा शारीरिक ऊर्जा कमी असलेल्या जनावरांत कृत्रिम रेतन करू नये.

## जनावरांची तयारी

### ओळख

- 12-अंकी INAPH कोड वापरून प्राणी ओळखले जातील याची खात्री करा.

### जंतनिर्मूलन

- नियमित अंतराने निवडलेल्या जनावरांचे जंतनिर्मूलन करावे.

### पोषण व्यवस्थापन

- कृत्रिम रेतन करण्या अगोदर किमान 30 दिवस आधी दर्जेदार खनिजे आणि जीवनसत्त्वांचे मिश्रण खायला द्या.
- गर्भ धारणेच प्रमाण वाढण्यासाठी दुहेरी ओवोसिनच या प्रोटोकॉल चा वापर करून एकत्रित सर्व जनावरांना माजावर आणणे फायद्याचे ठरेल.
- अधिक माहितीसाठी स्थानिक पशुवैद्यांचा सल्ला घ्या.

## कृत्रिम रेतन प्रक्रिया

### उत्तम माजाची लक्षणे

- योनी मधून स्पष्ट, पारदर्शक, घट्ट, चिकट स्त्राव बाहेर पडणे.
- लालसर, सुजलेले, रक्तसंचय झालेले जननेंद्रिय.
- दूध उत्पादनात घट होते, अवेळी पान्हवते. भूक मंदावते.
- वारंवार मूत्र विसर्जन, हंबरणे इ.
- कृत्रीम रेतनाची सर्वोत्तम वेळ - सकाळ किंवा संध्याकाळ.

### कृत्रिम रेतन प्रक्रिया

- बैलाच्या नावासह पिवळ्या रंगाच्या मार्कर पद्दीने वीर्याची कांडी ओळखा. वीर्याची कांडी असलेला पेला कंटेनरच्या द्रव रेषेच्या वर उचलू नका.
- पाण्याचे तापमान ३७°C तपासण्यासाठी तापमापीचा (Thaw Monitor) वापर करावा.
- एका वेळी फक्त एक वीर्याची कांडी वितळवा. एक वीर्याची कांडी पूर्णपणे 30-60 सेकंद पाण्यात बुडवा.
- वितळल्यानंतर शक्य तितक्या लवकर कृत्रिम रेतन करा.
- जास्तीत जास्त गर्भधारणा साध्य करण्यासाठी दुहेरी ओव्हो-सिंक प्रोटोकॉल वापरून कळप समक्रमित करण्याची शिफारस केली जाते. (सिंक्रोनाइझेशनची शिफारस फक्त गायींमध्ये केली जाते.)
- कृत्रिम रेतन माहितीचा लेखाजोखा ठेवावा.

04-28-09-2022


ABS 80 YEARS

जीनस ब्रीडिंग इंडिया प्राइवेट लिमटेड (ABS इंडिया)
नोंदणीकृत पत्ता: इटर्नीया प्रिमायसेस को-ऑप सोसायटी, पाचवा मजला, सी विंग,
डी ए युनीट ५०५/५०६ जवळ दगडी बंगला, वाकडेवाडी, पुणे - ४११००५ (महा).
:www.genusabsindia.com :abs.india@genusplc.com :1800 210 9210


Sexcel Sexed Genetics